ध्येय गाठण्यासाठी वचनबद्धता महत्वाची- सी.एस. प्रवीण निंगणुरे

"व्यक्तीच्या यशामध्ये व्यक्तिमत्व विकास महत्त्वाच्या असून इतरांवर प्रभाव पाडणे, छाप सोडणे, लोकांना आपल्याकडे आकर्षित करून घेणे त्यामधून यश गाठण्यासाठीचा मार्ग सुकर करणे यासाठी आकर्षक व्यक्तिमत्त्व म्हणजे परिश स्पर्श ठरू शकतो, परंतु व्यक्तिमत्त्वांमध्ये केवळ दिसणे महत्वाचे नसून वागण्याची, बोलण्याची, पेहेराव करण्याची शैली इत्यादी मध्ये देखील नीटनेटकेपणा, स्पष्टवक्तेपणा, हजरजबाबीपणा अत्यंत महत्वाचे असतात" असे उदगार सी. एस. प्रवीण निंगणुरे, हॅप्पी मॉर्निंग चे कोच यांनी काढले. श्री वेंकटेश महाविद्यालयांमध्ये कॉमर्स असोसिएशन मार्फत आयोजित 'व्यक्तिमत्व विकास' विषयावर आधारित कार्यक्रमांमध्ये ते बोलत होते. विद्यार्थ्यांनी ध्येय गाठण्यासाठी आवड असण्यापेक्षा वचनबद्ध असणे गरजेचे असते. आपल्या ध्येयाशी, विचाराशी व कृतीशी विद्यार्थ्यांनी वचनबद्ध असायला हवे. विद्यार्थ्यांनी आपल्या विचारावर लक्ष केंद्रित करायला हवे कारण तुम्ही जसा विचार करता तसे घडत असता. त्याचबरोबर योग्य मित्र-मैत्रिणींची संगत ठेवावी स्वतःच्या परिस्थितीचे भांडवल करत बसण्यापेक्षा, दोष देत बसण्यापेक्षा परिस्थितीलाच आपली ताकद बनवून वाटचाल करणे आवश्यक असते. विद्यार्थ्यांनी स्पर्धेच्या या युगात हार्डवर्क सोबत स्मार्टवर्क करायला शिकलं पाहिजे, त्यासाठी शिक्षणासोबत विविध सॉफ्ट स्किल्स आपल्या अंगी अवगत करणे अनिवार्य बनले आहे असे ते आपल्या मनोगतामध्ये म्हणाले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय माने यांनी विद्यार्थ्यांना व्यक्तिमत्व विकासाविषयी मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत असताना परखड, कठोर, पण तितकेच संवेदनशील, दयाळू वृत्ती, लवचिकपणा, वक्तशीरपणा, नीटनेटकेपणा, मृदुपणा इत्यादी अनेक गुण आपल्या व्यक्तिमत्त्वांमध्ये निर्माण करावे असे त्यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतामध्ये सांगितले. कॉमर्स विभागामार्फत आयोजित कार्यक्रमांमध्ये बी.कॉम. बी.कॉम. आय.टी. व बी.बी.ए. विभागाचे विद्यार्थी, प्राध्यापक वर्ग उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रस्ताविक व प्रमुख पाहुण्यांची ओळख डॉ. बी. एन. कांबळे यांनी करून दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन अनुक्रमे सहाय्यक प्राध्यापक टी. एन. मुल्ला व टी. एच. नायकवडे यांनी केले.

